# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक : २२६/२०१८

**M. Phil./Ph. D. Admission Process 2018-2019**

**विषय : एम.फिल/पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करणेबाबत .**

एम.फिल./पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथील मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांकरीता प्रवेश प्रक्रिया सुरू करावयाची असून याकरिता मार्गदर्शकांकडून रिक्त जागांची माहिती ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

मार्गदर्शकांनी खाली दिलेल्या सुचनेनुसार M.Phil./Ph.D. Guide Vacancy 2018-19 या लिंकवर User Manual मध्ये दिलेल्या सुचनेनुसार आपल्याकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती स्व:ताच्या Teacher Login वरून ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या **unipune.ac.in** या संकेतस्थळावरून **दि. २८/१२/२०१८** पर्यंत आपल्या संशोधन केंद्रामार्फत सादर करावी. ज्या मार्गदर्शकांना शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये विद्यार्थी घ्यावयाचे नसतील त्यांनीही आपल्याकडे नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची अद्ययावत माहिती सादर करणे आवश्यक आहे.

मार्गदर्शकांसाठी ऑनलाईन प्रक्रिया :–

- मार्गदर्शकांनी आपल्या BOD Online च्या Teacher Login व्दारे Login करावे.
- Login झाल्यानंतर Vacant Position for M.Phil./Ph.D. Admission 2018-2019 या मधुन Link Open करावी.
- Declare Vacancies या टेबल मधील Edit बटणावर Click करावे.
- मार्गदर्शकांना रिक्त जागांची माहिती भरताना खालील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे.
    - Approval संदर्भाची माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.
    - PG Recognition/Research Guide Details संदर्भातील माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.

University Grants Commission (Minimum Standards and Procedure for award of M.Phil./Ph.D. Degree) Regulation 2016 मध्ये शिक्षकांच्या संवर्गनिहाय संशोधनासाठी घ्यावयाच्या विद्यार्थी संख्येबाबत मर्यादा घालुन देण्यात आलेली आहे.

| | | पीएच.डी. | एम.फिल. |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | : जास्तीत जास्त | ०८ | ०३ |
| सहयोगी प्राध्यापक | : जास्तीत जास्त | ०६ | ०२ |
| सहायक प्राध्यापक | : जास्तीत जास्त | ०४ | ०१ |

प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाने मागासवर्गीयांसाठी विहित केलेले आरक्षण लागू राहील.

- मार्गदर्शकांकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी Ph. D. Tracking System मध्ये Online नोंदणी केलेली असेल व ते संशोधन केंद्राने Confirm केले असल्यास अशा विद्यार्थ्यांची माहिती सध्या नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची अद्यावत स्थिती Current Registered Students For Ph.D. येथे दिसून येतील.

- शैक्षणिक वर्ष २०१७—१८ मध्ये प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांनी अद्याप Ph.D. Tracking वर माहिती अद्ययावत केलेली नसल्याने सदर विद्यार्थ्यांची माहिती मार्गदर्शकांच्या Login वर अद्ययावत होणार नाही. त्यामुळे संबंधीत मार्गदर्शकांनी आपल्याकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती दिलेल्या Application मध्ये स्वत: अद्ययावत करावी. आपणांकडे नोंदणी केलेल्या विद्यार्थी संख्या वगळून उरलेल्या रिक्त जागांपैकी यावर्षी जेवढे विद्यार्थ्यी घ्यावयाचे असतील तेवढीच संख्या रिक्त जागा (Vacant Position) म्हणून टाकण्यात यावी.

- M.Phil. अभ्यासक्रमासाठी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती लिंकवर उपलब्ध नसल्याने मार्गदर्शकांनी आपल्याकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्याची माहिती प्रवर्गानुसार अद्ययावत करावी.

- ज्या मार्गदर्शकांना यावर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थी घ्यावयाचे नसतील अशा मार्गदर्शकांनी निरंक (Nil) म्हणून रिक्त जागांची माहिती अद्ययावत करावी. मार्गदर्शकांनी वर उल्लेख केलेल्या सुचनेनुसार माहिती अद्ययावत करून Dropdown वरून सेव्ह करावी.

- मार्गदर्शकांनी आपल्याकडे संशोधन करित असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती व रिक्त जागांची माहिती ऑनलाईन पध्दतीने जतन (save) केल्यानंतर सदर माहिती आपल्या संशोधन केंद्रामार्फत सादर करणे बंधनकारक आहे. सदर माहिती संशोधन केंद्रामार्फतच ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या Ph.D. System वर सादर होणार असल्याने मार्गदर्शकांनी आपली माहिती विहित मुदतीत सादर झाली किंवा नाही याबाबत संबंधीत संशोधन केंद्राकडे पाठपुरावा करावा.

- मार्गदर्शकांनी आपली माहिती विहित मुदतीत संशोधन केंद्रामार्फत सादर न झाल्यास M.Phil./ Ph. D. Admission Process 2018-2019 साठी रिक्त जागा विचारात घेतल्या जाणार नाही.

- मार्गदर्शकांना जास्तीत जास्त दोन संशोधन केंद्रामध्ये व दोन विषयासाठी विद्यार्थी घेता येणार असल्याने मार्गदर्शक म्हणून मान्य असलेल्या दोनच विषयासाठी रिक्त जागांची माहिती अद्ययावत करावी. माहिती अद्ययावत करताना यासंदर्भात काळजी घेण्यात यावी.

संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभागासाठी ऑनलाईन प्रक्रिया :—

- संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभागाअंतर्गत ज्या मार्गदर्शकांनी ऑनलाईन माहिती भरलेली असेल अशा मार्गदर्शकांची माहिती संशोधन केंद्राच्या Login मधुन Ph.D. Tracking → Guide List → Confirm Button करून स्वीकारावी.
- संशोधन केंद्रांनी मार्गदर्शकांनी अद्ययावत केलेल्या माहितीची पडताळणी करूनच ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

मार्गदर्शकानी संशोधन केंद्रामार्फत Vacant Position for M.Phil./Ph.D. Admission 2018-2019 मध्ये नोंदणी करणे बंधनकारक असुन नोंदणी नसलेल्या मार्गदर्शकांची पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेची पुढील कोणतीही प्रक्रिया केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :—

- ई—मेल आयडी :— phd.mphiladmis@pun.unipune.ac.in

11/12/2018

उपकुलसचिव,
**शैक्षणिक प्रवेश विभाग**

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/५१६०
दिनांक : ११/१२/२०१८

प्रत :—

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात/संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.